# महिला सशक्तिकरण आणि ग्रंथालये

डॉ. रंजना व्यवहारे

प्रस्तावना:—

आज आपल्या भारत देशात महिला सशक्तिकरणासाठी नेहमीच सरकारकडून वेगवेगळे उपक्रम राबविल्या जातात. महिलांना सक्षम करण्यासाठी वेगवेगळे बचत गट, लघूउद्योग, गृहउद्योग छोटे छोटे व्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहन करित असतात. या छोटया—मोठया व्यवसायातून त्यांना खूप शिकायला मिळते आणि त्याचबरोबर कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्याकरिता मदतही मिळते. देशाचा, कुटूंबाचा विकास साध्य करायचा असेल तर महिला सशक्तिकरणाइतके महत्वाचे साधन नाही. आज महिला कोणत्याही क्षेत्रात कमी राहिल्या नाही. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविला आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला पुरूषाच्या बरोबरीने काम करतांना दिसून येतात.

आज महिलांची जी स्थिती आपल्याला समाजात दिसून येते ती पुर्वीपासूनच आहे असे म्हणता येणार नाही. पूर्वीच्या काळात महिलांना अनेक अन्याय — अत्याचाराला सामोरे जावे लागत, त्यांना स्वत:च्या हक्कासाठी समाजासोबत, कुटूंबासोबत झगडावे लागले. महिलांना स्वतंत्र स्थान आहे हे समाज मान्य करायला तयार नव्हता. आपली भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान संस्कृती आहे. या पुरुषप्रधान संस्कृतीत पूरूषांना मागे टाकून स्त्रिने समोर यावे ही कल्पना समाजाच्या विचार चौकटीतच बसत नव्हती. त्यांना अनेक हक्कापासून वंचित ठेवण्यात येत होते.

परंतू विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून स्त्रियांच्या अवस्थेत बदल होतांना दिसून येत आहे. त्यांना हळूहळू घरातील कार्यात सहभागी करून घेऊ लागले. अर्थाजनासाठी स्त्रिया बाहेर पडू लागल्या. म्हणजेच स्त्रिच्या सामाजिक, आर्थिक, परिस्थितीत बदल घडून येऊ लागले. हळूहळू स्त्रिया सर्वच क्षेत्रात वावरतांना दिसून येत आहे. आज स्त्री अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, प्राध्यापक, मंत्री, अशा अनेक रूपांनी विविध क्षेत्रात वावरतांना दिसून येतात. आपल्या कतृत्वाने तिने अनेक क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले आहे.

असे जरी असले तरी आपल्या भारतात अजूनही कित्येक महिलांची स्थिती दयनीय असल्याचे दिसून येते. सरकार अशा महिलांच्या सशक्तिकरणाकरिता वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम राबवितात. यात प्रौढ शिक्षण, स्त्री व बालकल्याण योजना, रोजगार व तांत्रिक शिक्षण, आरोग्यपर, महिला बचत गट अशा वेगवेगळया प्रकारे कार्यक्रम राबवून महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

ग्रंथालय:—

पुर्वीच्या काळापासूनच ग्रंथालय समाजाचे एक अविभाज्य घटक मानला जातो. समाजाला प्रत्येक क्षेत्रातील माहिती पुरविण्याचे काम ग्रंथालय करीत आहे. ग्रंथालयाला एक महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ग्रंथालय शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, मनोरंजनपर माहितीची गरज भागविण्याचे एक महत्वाचे केंद्र आहे. पुर्वीच्या काळी ज्या व्यक्तिंना ग्रंथ वाचनात आवड वाटत असेल ती व्यक्ती ग्रंथालयात जावून आपल्या वाचनाची आवड पूर्ण करीत असे. यात महिलांचाही सहभाग राहायचा. आधीच्या काळापासून समाजाला सक्षम करण्यात ग्रंथालयाची भूमिका महत्वाची आहे. महिला सशक्तीकरणातही ग्रंथालयाचे महत्वाचे स्थान असल्याचे म्हणू शकतो. ग्रंथालयात महिलांना वाचनीय वेगवेगळे साहित्य राहते. यात महिलापर वेगवेगळे मासिक,यात जनरल, सामाजिक, आरोग्यपर तसेच वेगवेगळी पुस्तके यात जनरल नॉलेज, आरोग्यपर, कविता, थोर व्यक्तिंची चरित्रे, संत साहित्यपर साहित्य, कथा, कादंबरी, नाटके, कविता, व्यक्तिमत्व विकास इ. वाचनीय साहित्याचा वापर करून स्त्रिया आपल्या व्यक्तिमत्वात बदल घडवून आणू शकतात. घरातील स्त्रिया जर शिक्षित झाल्या तर संपूर्ण घराला त्या शिक्षित करू शकतात.

आधुनिक काळात लोकांना वेगवेगळया क्षेत्रातील नवीन माहितीची गरज पडत असून ही माहिती त्यांना तात्काळ पाहिजे असते. या माहितीची गरज ग्रंथालयातून पूर्ण होऊ शकते. आधुनिक ग्रंथालयात तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर होतांना दिसतो आहे. ग्रंथालय ही ज्ञानकेंद्र असून ती आता फक्त पुस्तके किंवा ग्रंथाचा साठा असणारी एक इमारत नसून वेगवेगळया विषयाच्या माहितीचा साठा असणारे एक ज्ञान भंडार आहे. रोज

Dr. Anushka Kulkarni, Assistant Professor, Amity School of Communication,
Amity University Mumbai. Email: aakulkarni@mum.amity.edu.

नविन माहितीची निर्मिती होत आहे. या माहितीचा प्रसार, संशोधनास चालना देण्यास, वाचन संस्कृती जोपासने यासाठी ग्रंथालय महत्वाची भूमिका बजावत आहे.

महिला शिक्षण आणि ग्रंथालय:—

समाजात पहिलेपासूनच महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. महिला म्हणजे चुल आणि मूल इतपर्यंतच तिची मर्यादा ओलांडल्या गेली होती. बाहेरील जगातील कोणतेच आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अधिकार तिला घेण्याचा अधिकार नव्हता. पण जसजसा काळ समोर सरकत गेला तसतसे महिलांच्या हक्काबाबत जागरूकता निर्माण होण्यास सुरूवात झाली. यात अनेक समाजसुधारकांची महत्वाची भूमिका आहे. महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकविले. पुण्यात मुलींसाठी शाळा उघडली आणि सावित्रीबाईंना शिक्षिका बनविले. ख—या अर्थाने तेव्हापासून मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. मुलांच्या बरोबरीने मुलींना शिक्षणाचा समान दर्जा प्राप्त झाला.

महिलांनी जास्तीत जास्त प्रमाणात सबल व्हावे म्हणून थोर व्यक्तिंनी महिलासाठी असणा—या रूढी, परंपरा नष्ट करण्यास सुरूवात केली. राजा राममोहन रॉय यांनी समाजातील सती प्रथा, हुंडाबळी विधवा विवाह यांच्या प्रती असणा—या रूढी संपुष्टात आणण्यास सुरूवात केली. विद्यासागर, विनोबा भावे, स्वामी विवेकानंद यांनी महिलांनी स्वत: स्वावलंबी बनावे म्हणून प्रौढ शिक्षण सुरू केले. गावागावात प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालायला सुरूवात झाली. यात काही प्रमाणात का होईना महिलांना शिक्षित करण्याचा प्रयत्न सुरू झाला. यातूनच शिक्षण घेऊन महिला काही प्रमाणात पुस्तक वाचायला लागल्या. हळूहळू स्त्रियाच्या शिक्षणात वाढ व्हायला सुरूवात झाली. शिक्षण घेताघेता त्यांना वाचनाची आवड निर्माण होणे साहजीकच होते. वाचता येते म्हणून अजून वाचावे या उद्देशाने त्या वेगवेगळया प्रकारची पुस्तके वाचायला लागल्या. त्यात अनेक प्रकारच्या पुस्तकांचा समावेश असणे साहजिकच होते. ही सर्व पुस्तके घरी असणे शक्य नसल्याने त्या ग्रंथालयात जावू लागल्या.

आधुनिक काळात तर स्त्रिया सर्वच क्षेत्रात वावरतांना दिसून येतात. आज समाजात ग्रंथालय आणि शिक्षण यांचे समीकरण झाले आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थामध्ये ग्रंथालय अनिवार्य आहेच पण शैक्षणिक संस्थाव्यतिरीक्त अनेक ग्रंथालय स्थापन झालेले आहे. समाजातील लोकांकरिता, व्यक्तिकरिता सार्वजनिक ग्रथालय स्थापन झालीत, संशोधन करण्याकरिता रिसर्च सेंटर स्थापन झाली आहेत. आजही कित्येक महिला या घरी राहणा—या असून घरी राहून त्या आपला छोटा मोठा व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. याची माहिती सर्वप्रथम त्या घेतात. आपल्या आसपासच्या ग्रंथालयात जावून सभासदत्व घेतले तर त्यांना पाहिजे ते वाचनीय साहित्य मिळू शकते. त्यात महिलांच्या आरोग्यविषयक पुस्तके वाचायला मिळतात, तसेच आध्यात्मिक, पौराणीक, आत्मचरित्रपर वेगवेगळया व्यक्तिंची प्रोत्साहनपर, पुस्तके वाचून स्वत:च्या व्यक्तिमत्वात सुधारणा आणू शकतात. स्त्रियांनी जर ग्रंथालयातील पुस्तके वाचलीत तर त्याचा प्रभाव त्यांच्यावर होऊन त्या आपल्या मूलांना सूध्दा अनेक पुस्तकाविषयी माहिती देऊ शकतात. एक शिक्षित स्त्री संपूर्ण कुटूंबाला शिक्षित आणि सक्षम बनवण्यास मुख्य भूमिका निभावू शकते. आपल्या बरोबर संपूर्ण कूटूंबाला, समाजाला सक्षम बनविण्याची शक्ती तिच्यामध्ये ग्रंथवाचनाने येऊ शकते.

सार्वजनिक ग्रंथालये ही तर समाजातील व्यक्तिकरीता सर्व स्तरावर प्राथमिक माध्यमिक उच्चतर अनौपचारिक .प्रौढ शिक्षणास मदत करीत असतात. पण शैक्षणिक ग्रंथालयात सुध्दा सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करुन आपल्या परिसरातील महिलाकरिता वेगवेगळया कार्यक्रमाचे आयोजन करू शकतो. सर्वप्रथम एक उदबोधक कार्यक्रम घेऊन महिलांना ग्रंथालयाविषयी सर्व सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. जसे की, ग्रंथालयातील पुस्तके, ग्रथालयात येणा—या मासिका विषयी, न्युज पेपर, ग्रंथालयाचे नियम ही प्राथमिक माहिती देणे अनिवार्य आहे. नंतर त्याना आपल्या ग्रंथालयात प्रत्यक्ष आणून संपूर्ण ग्रंथालयाची ओळख करुन दयावी. प्रत्यके कपाटाजवळ नेऊन ती कोणत्या प्रकारची पुस्तके आहेत याचा परिचय करून दयावा. जेणेकरून ग्रंथालयातील पुस्तके मासिके, कथा, कादंबरी, नाटक बघून त्यांनासुध्दा वेगवेगळया पुस्तक वाचनाची आवड निर्माण होऊ शकेल. एकदा का वाचनाची आवड निर्माण झाली की आपला रिकामा वेळ वाया न घालवता काहीतरी वाचत राहणे हा छंद बनतो आणि यातूनच अनेक स्त्रीया विचाराणे, राहणीमाणाने, एखादया व्यक्तिविषयी विचार करण्याने, किंवा एखादया गोष्टीचा आपल्या जीवनावर काय प्रभाव पडू शकतो याने सक्षम बनू शकतात. सकारात्मक विचार करण्याची ताकद निर्माण होते. अनेक गोष्टीचे निर्णय स्वत: घेण्यास सक्षम बनू शकतात. ग्रथालयाचे सभासदत्व असणा—या महिलांकरिता वेगवेगळे कार्यक्रम राबवून त्यांना सक्षम करता येणे शक्य होवू शकेल.

१) आरोग्यविषयक कार्यक्रम :—

स्त्रियांच्या आरोग्यविषयी माहिती सांगणारी एखादी स्त्री डॉक्टराचे व्याख्यान, यात स्त्रियांच्या आरोग्यविषयी अनेक गैरसमज दूर करू शकतो. स्त्रियाच्या अनेक अडचणी असतात. त्या अडचणी डॉक्टरला सांगून आरोग्यविषयी सक्षम करण्यास मदत होईल

२) सेमिनार :— एखादा रोजगार विषयी कार्यक्रम घेऊन महिलांना त्यांच्या विकासासाठी स्वयंसेवी कार्यक्रम, रोजगार व तांत्रिक शिक्षण, कौशल्यपर शिक्षण, बचत गटाची निर्मिती, लघूउद्योग, बचत गटाच्या माध्यमातून कशाप्रकारे स्वयरोजगार करू शकतील याबद्दल त्यांना शिक्षित करणे. तसेच घरच्या घरी राहून अनेक छोटे व्यवसाय कशाप्रकारे करू शकतील याचेही मार्गदर्शन करू शकतो. यातून अनेक महिला उद्योजिका बनू शकतात.

३) कार्यशाळा :— यात महिलांना घरबसल्या बॅग बनविणे, पिशव्या तयार करणे, ज्वेलरी तयार करणे, त्यांना जमेल अशा वस्तू तयार करण्याची एक कार्यशाळा घेऊन स्वयंरोजगार प्रशिक्षणाचे आयोजन करून त्यांना सक्षम बनवू शकतो. तसेच ज्या महिला स्वयंरोजगार करू शकतात त्यांच्याकरिता वेगवेगळया स्किम कोणत्या आहेत. आणि त्याचा उपयोग कशापध्दतीने घेवू शकतात याचेही मार्गदर्शन महिलांना करता येऊ शकते.

४) स्पर्धेचे आयोजन :— ग्रंथालयाच्या सदस्य असलेल्या महिलांकरिता वेगवेगळया स्पर्धाचे आयोजन करणे, जसे वाचन स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, कविता, अशा अनेक प्रकारच्या स्पर्धाचे आयोजन करून त्यांच्यात लपलेल्या सुप्तगूणांना बाहेर काढण्याकरिता प्रयत्न केल्या जावू शकते. यातून ज्या जिंकतील त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात यावे जेणेकरून इतर महिलांना त्यापासून प्ररणा मिळू शकेंल. अशा स्पर्धामधून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्या जावून त्यांना सक्षम बनविण्याचा एक प्रयत्न होवू शकेंल.

या सर्व शिक्षणाचा महिलांना उपयोग होवून महिला सशक्तिकरणावर खालील प्रकारे प्रभाव पडू शकेल.

१) महिलांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

२) स्त्रीयांच्या शिक्षणात भर होईल.

३) शिक्षणामुळे महिलांच्या आत्मविश्वास व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडू शकेल.

४) महिलांना शिक्षणामूळे समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होवू शकेल.

५) महिला छोटया छोटया व्यवसायाचे का होईना उद्योजिका बनू शकतात.

६) घरातील महत्वाच्या कार्यात निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होण्यास मदत.

७) शिक्षणामूळे मुलांच्या शिक्षणात लक्ष देण्यास मदत होवू शकेल.

८) आपला व आपल्या घरच्या लोकांच्या आरोग्याविषयी सतर्कता बाळगण्यास मदत मिळेल.

९) देशाच्या विकासात काही—प्रमाणात महिलांचा सहभाग मिळू शकेल.

अशा प्रकारे महिला जर शिक्षित झाल्या तर त्यांचा संसारात, समाजात, देशाच्या सबळ होण्यास महत्वाची भूमिका असू शकते. आधुनिक समाज महिलांच्या अधिकाराबाबत अधिकच जागरूक होतांना दिसतो. यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था, सरकार, कार्य करतांना दिसत आहे. शिक्षणामुळे महिला एखादया विषयावर आपले विचार व्यक्त करू शकतात, आपले अधिकार काय याची समज त्यांना सहज येवू शकते. यामुळेच त्यांना योग्य स्थान प्राप्त करता येणे शक्य होऊ शकते.

निष्कर्ष :—

कोणत्याही राष्ट्राच्या विकासात ग्रंथालयाचे अतिशय महत्वाचे स्थान आहे. वाचकांच्या विविध गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न ग्रंथालये करित असतात. विविध प्रकारची माहिती मिळविण्याचे एक स्त्रोत ग्रंथालय आहे आणि ग्रंथालयातून विविध सेवा प्रदान केल्या जातात. महिला सक्षमिकरणातही वाचनालयाची महत्वाची भूमिका आहे. कारण महिलांना स्वत: सक्षम करण्याकरिता, कुटूंबाला, समुदायाला विकसीत करण्याकरिता मदत करते. स्त्रियांच्या शिक्षित होण्यास, स्वावलंबी बनण्यास, आत्मविश्वास वाढविण्यास पुस्तकांनी भूमिका महत्वाची आहे. ग्रंथालयातून पुस्तकी माहिती देऊन महिलाना सक्षम बनवण्या सोबतच काही प्रभावी मार्गदर्शनपर कार्यक्रम, जसे कार्यशाळा, सेमिनार, व्याख्यान स्वयंरोजगार प्रशिक्षण अशा प्रकारचे आयोजन ग्रंथालयाच्या माध्यमातून करून महिलांना शिक्षित करण्याचा प्रयत्न करून महिलांना सशक्तिकरण केल्या जावू शकेल.

संदर्भ सूची

१) गुप्ता, कमलेश कुमार :. महिला सशक्तिकरण, बुक एनक्लेव, जयपूर

२) शर्मा, रमा :. महिला विकास, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली

३) P.K,SASI – Role of Public Library on women Empowerment, www.losrJournals.org